पोलीस आयुक्त, कार्यालय, सोलापुर शहर
सर्व्हे नं.२११, प्लॉट नं.३५, गांधी नगर, सोलापुर
दुरध्वनी क्रमांक - ०२१७-२७४४६०५ Email -pisb.cpsol@mahapolice.gov.in

जा.क्र.विशा-०२/ २५३ /२०२५ पोलीस आयुक्तालय, सोलापुर शहर दि.२१/०१/२०२५

**विषय :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ प्रमाणे मनाई आदेश.**

---ooo---

ज्या अर्थी आमचे असे निदर्शनास आले आहे की, दरवर्षी मकरसंक्रात उत्सवा दरम्यान पतंग उडविण्यासाठी पक्का दोरा वापरला जातो, जो की प्लास्टिक/ सिंथेटीक/नॉयलॉन साहित्य वापरुन बनविलेला असतो. ज्यास सर्वसामान्यपणे नायलॉन मांजा म्हणून ओळखतात. सदर नायलॉन मांजामुळे सर्वसामान्य नागरिकांचे व पशुपक्षांचे जीविताचे रक्षण करणे हे आमचे प्रथम कर्तव्य आहे. त्या करिता पतंग उडविण्यासाठी वापरला जाणारा दोरा जो की, नायलॉन/प्लास्टिक किंवा सिंथेटीक मटेरियलने बनविला जातो, त्यावर प्रतिबंध घालणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी आमचे असे निदर्शनास आले आहे की, तुटलेल्या / कापलेल्या पंतगाचे धागे हे जमीनीवर पडतात, सदर दोरे हे दिर्घकालीन नाश न पावणारे असून नायलॉन /प्लास्टिक/ सिंथेटीक मटेरियल हे नैसर्गिकरित्या विघटन न होणारे साहित्य आहे. हे निसर्गास व पर्यावरणास देखील घातक आहे. सदर दोरा गटारी, ड्रेनेज लाईन, पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन, नद्या, नाले तुंबण्यासाठी कारणीभुत होतो. तसेच जनावरे हे चारा खाताना चुकून नायलॉनचा मांजा खातात, त्यामुळे प्राण्यांना शारिरिक समस्या निर्माण होतात. दिवसेंदिवस पक्षांच्या संख्येत घट होताना दिसून येत आहे. पतंगाच्या मांजामुळे आकाशात उडणारे पक्षी जखमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मांजामुळे दुचाकी वाहन चालविण-या नागरिकांना देखील गंभीर दुखापत, अपघात होण्याचा संभव असतो. याकरिता नायलॉन/प्लास्टिक किंवा सिंथेटीक दोऱ्याचा वापर करुन पतंग उडविण्याकरीता प्रतिबंध करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी आमचे असे निदर्शनास आले आहे की, सोलापूर शहरात मकरसंक्राती व त्यानंतरच्या काळात पतंग उडविण्याचा उत्सव साजरा होत असून त्यासाठी नायलॉन/प्लास्टिक किंवा सिंथेटीक यापासून बनविलेला मांजा मोठया प्रमाणात वापरला जातो.

त्याअर्थी मी एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर मला प्रदान केलेल्या अधिकारांन्वये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ नुसार दिनांक २१/०१/२०२५ ते दिनांक २०/०२/२०२५ या ३० दिवसाच्या कालावधीमध्ये पतंग उत्सवादरम्यान पक्का दोरा जो की नायलॉन मांजा म्हणून ओळखला जातो, जो नायलॉन/प्लास्टिक किंवा सिंथेटीक मटेरियलने बनविला जातो, असा दोरा/मांजा वापरणे, बाळगणे, विकणे व साठा करणे करीता प्रतिबंध करण्यात येत आहे. सदरचा आदेश हा दिनांक २१/०१/२०२५ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक २०/०२/२०२५ चे २४.०० वा. पर्यंत अंमलात राहिल.

जो कोणी व्यक्ती सदर आदेशाचा भंग करेल तो भारतीय न्याय संहिता-२०२३ चे कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र राहिल.

स्थळ :- सोलापूर शहर
दिनांक :- २१/०१/२०२५

( एम. राज कुमार )
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर

प्रति कार्यवाहिस्तव :-

वपोनि फौजदार चावडी/जेलरोड/एमआयडीसी/जो.पेठ/स.बझार/वि.नाका/स.वस्ती पोलीस ठाणे,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी सोलापूर यांना प्रसिध्दी करीता.
सहा.पोलीस आयुक्त विभाग १/२,प्रशासन,गुन्हे,शवाशा.
पोलीस उप-आयुक्त, (मुख्यालय)/(परिमंडळ)/(गुन्हे/विशा).
माहिती कक्ष, सोलापूर शहर.

**२/- माहिती कक्ष प्रभारी अधिकारी यांनी सदरचा आदेश हा सर्व दैनिकात/स्थानिक वृत्त वाहिनीवर प्रसिध्दीस दयावा.**

**प्रत माहितीस्तव :-** मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा.जिल्हाधिकारी. सोलापर

Scanned with CamScanner